| MHK0170012212024 | **रे.कब्जा.नं. १५१/२०२४**<br>**सुंदाबाई ज्ञानू पाटील वगैरे ३**<br>**वि.**<br>**द्रोपदी शंकर मोळे वगैरे १४** |
|---|---|

## आदेश नि. ४० व ४१ वर एकत्रीत आदेश

१. वादी यांनी प्रस्तुतचे अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता, १९०८ आदेश ६ नियम १७ प्रमाणे दावा व तुर्तातुर्त मनाई अर्ज मध्ये दुरुस्ती करणेकरिता दाखल केलेले आहेत.

२. प्रतिवादी क्र. ३ ते १४ यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन अर्जाचे कामी न्यायोचित आदेश पारीत करणेत यावेत असे नमूद केले आहे.

३. प्रतिवादी क्र. १, २ व १५ यांनी अर्जावर म्हणणे दाखल करुन दोन्ही अर्जास विरोध केला आहे.

४. वादीतर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. के.जी.पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, सदरचा दावा वाटप, हक्कज्ञापन, कायम मनाई व खरेदीखत रद्द करण्याकरिता दाखल केलेला आहे. दावा दाखल करतेसमयी नजरचुकीने दावा विनंती कलम ९ ड व मनाई अर्जातील विनंती कलम १० क मध्ये नजर चुकीने व टंकलिखीत दोषामुळे "बांधकाम अगर तबदीली करु नये " हे नमूद करण्याचे राहून गेले आहे. परंतू दावा मिळकतीची वस्तुस्थिती पाहता प्रतिवादी क्र. १५ हे दावा मिळकतीत केव्हाही बांधकाम करु शकतात व त्यामध्ये तबदिली करु शकतात त्यामुळे दावा व तुर्तातुर्त मनाई अर्जाच्या विनंती कलमात दुरुस्ती होणे अत्यंत गरजेचे आहे. तसेच, मुळ दाव्याच्या परिच्छेद क्र. ३.७ मध्ये व तुर्तातुर्त मनाई अर्जाच्या परिच्छेद क्र. ३.६ मध्ये सदरचा मजकूर हा मूळातच नमुद आहे. त्यामुळे सदरची दुरुस्ती केल्यास दाव्याच्या मूळ स्वरुपात कसलाही फरक पडणारा नाही. तसेच, दावा दुरुस्ती झाल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणारे नाही. अंतिमतः वादी तर्फे वकील यांनी दोन्ही अर्ज मंजूर करणेत यावे अशी विनंती केली.

५. प्रतिवादी क्र. १ , २, व १५ तर्फे सन्माननीय विधीज्ञ श्री. पी.डी. पाटील यांनी असा युक्तीवाद केला की, प्रस्तुत दावा वादी यांनी वाटप व मनाई मिळणेकरीता दाखल केला आहे. वादी यांनी मागितलेली दुरुस्ती ही अप्रस्तुत व कोर्टाचा अमुल्य वेळ वाया घालविणारी आहे. तसेच सदरची दुरुस्ती कोणत्या कारणाने करावी लागत आहे याबाबत अर्जात कोणतेही सबळ कारण नमुद नाही. प्रस्तुत मिळकत ही प्रतिवादी क्र. १५ यांचे ताब्यात आहे. वादी यांनी संपूर्ण दावा अथवा अर्जात कोठेही तबदिली अथवा इतर कोणतीही शक्यता दर्शवलेली नाही. तसेच, दाव्याचे पुर्णपणे अवलोकन गरजेचे आहे. दावा व त्याचे विनंती कलम हे दाव्याशी मिळते जुळते असले पाहिजे. अन्यथा सदरचा दावा हा नामंजुर होण्यास पात्र ठरतो. तसेच, सदरची दुरुस्ती मंजूर झालेस प्रतिवादींचे नुकसान होणारे आहे. अंतिमतः प्रतिवादी तर्फे वकील यांनी वादी यांचा अर्ज खर्चासह नामंजूर करण्यात यावा अशी विनंती केली आहे.

६. दोन्ही अर्ज वाचले. कागदपत्रांचे अवलोकन केले.

७. प्रस्तुत प्रकरण हे वाटपाकरीता व मनाई अर्जाकरीता दाखल करण्यात आलेले आहे. तसेच, दाव्यामध्ये अजून वाद मुददे काढण्यात आलेले नाहीत. तसेच, आदेश ६ नियम १७ चे अवलोकन केले असता असे दिसून येते की, दाव्यामध्ये गरजेची वाटल्यास सुधारण करता येउ शकते. सदरची सुधारणा करण्याकरीता त्याबाबतचे स्पष्टीकरण हे पटलावर येणे आवश्यक आहे. तसेच, दावा चौकशीला लागण्याच्या अगोदर कोणीही पक्षकार हे दाव्यामध्ये दुरुस्ती/सुधारणा मागू शकतात. वादी यांच्या दाव्याचे अवलोकन करता ही गोष्ट सहजगत्या दिसून येणारी आहे की, वादी यांच्या दावा परिच्छेद क्र. ३.७ व मनाई अर्ज परिच्छेद क्र. ३.६ मध्ये सदरचे दोन्ही शब्द हे दिसून येत आहेत. तसेच, दावा व विनंती कलम हे एकत्रीतरीत्या विचारात घ्यावे लागते. त्यामुळे वादी यांच्या दाव्यात मुळातच दुरुस्ती करावे लागणारे शब्द दिसून येत आहेत.

८. दिवाणी प्रक्रिया संहिता आदेश ६ नियम १७ चे अवलोकन केले असता ही गोष्ट स्पष्ट होणारी आहे की, न्यायालय कार्यवाहीच्या कोणत्याही टप्प्यावर कोणत्याही पक्षकारास

त्याच्या वादकथनास न्याय असेल अशा रितीने व अशा अटीवर दुरुस्ती करण्याची मुभा देईल. तसेच वादग्रस्त असलेला खराखुरा प्रश्न निर्णित करण्यासाठी आवश्यक असतील अशा सर्व सुधारणा करण्याची परवानगी देईल. या तरतुदीला विशिष्ट अट देण्यात आलेली आहे. त्यानुसार सुनावणी सुरु झाल्यानंतर अशा कोणत्याही सुधारणेला न्यायालय परवानगी देणार नाही. तसेच जर कोणताही पक्षकार हा सुद्धा सुनावणी सुरु झाल्यानंतर त्याच्या वतीने त्याला सुनावणी सुरु होईपर्यंत दुरुस्ती का करता आली नाही याचे योग्य कारण दर्शवू शकला, तरच अशावेळी न्यायालय दुरुस्तीची परवानगी देईल. प्रस्तुत तरतूद व त्यातील विशिष्ट अट यांचे अवलोकन केले असता ही गोष्ट स्पष्ट होणारी आहे की, न्यायालय दुरुस्ती करण्याची परवानगी देईल. मात्र अशावेळी पक्षकारांमध्ये असलेला वादग्रस्त प्रश्नाचा निर्णय होतोय किंवा कसे हे देखील पाहणे तितकेच आवश्यक ठरते.

९. रोजनाम्याचे अवलोकन करता ही गोष्ट स्पष्ट होणारी आहे की, दाव्यामध्ये अजून सुनावणी सुरु झालेली नाही. तसेच वादी मागत असलेली दुरुस्ती तसेच तिचे स्वरुप पाहता त्यामुळे दाव्याचे मूळ स्वरूप बदलणार नाही असे वाटते. तसेच, प्रतिवादी यांचे म्हणणे विचारात घेता वादी यास दुरुस्ती करणे परवानगी देणे योग्य होईल असे वाटते.

१०. वादी हा दावा व तुर्तातुर्त मनाई अर्जात दुरुस्ती मागत आहे. दिवाणी प्रक्रिया संहितेच्या आदेश ६ नियम १ नुसार वादकथन याचा अर्थ वादपत्र किंवा प्रतिवाद पत्र असा आहे. या तरतुदीचे अवलोकन केले असता दावा अथवा कैफियत या करिता आदेश ६ हा लागू होतो. मात्र दाव्यातील मजकूर हाच तुर्तातूर्त मनाई अर्जातील मजकूर असल्यामुळे दाव्यात बदल झाल्यास तशा पद्धतीचा बदल हा तुर्तातूर्त मनाई अर्जात न्यायहितास्तव करण्याची वादीस परवानगी देता येईल. कारण दावा व मनाई अर्ज हे परस्पर संबंधित आहेत. त्यामुळे जर दाव्यामध्ये सुधारणा झाली तर निश्चितच मनाई अर्ज यामध्ये देखील परिणामतः सुधारणा करण्यास परवानगी देणे हे तितकेच आवश्यक आहे असे वाटते. दिवाणी प्रक्रिया संहिता याचे अवलोकन केले असता अशा पद्धतीची तरतूद अर्जाकरिता दिसून येत नाही.

मात्र न्याय हिताचा विचार करता तसेच प्रस्तुत वादीने मागितलेली दुरुस्ती ही केवळ स्पष्टीकरणात्मक दुरुस्ती असल्यामुळे वादी यास न्यायहितास्तव परवानगी देणे योग्य होईल असे वाटते.

११. सबब एकूण अर्जाचा विचार करता व त्यामधील विनंतीचा विचार करता वादी यास दावा व मनाई अर्ज यामध्ये दुरुस्ती करण्यास परवानगी देणे योग्य होईल असे वाटते. त्यामुळे मी पुढील आदेश पारीत करीत आहे.

## <u>आदेश</u>

**१. वादी यांचा नि. ४० व ४१ वरील अर्ज मंजूर करण्यात येत आहे.**

**२. वादी यांनी दावा व मनाई अर्जात दुरुस्ती करुन दुरुस्त प्रत १४ दिवसांमध्ये दाखल करावी.**

सही/–

दि. २३/०४/२०२५.

**( के. दि. काकतकर )**
सह दिवाणी न्यायाधीश क.स्तर,
पन्हाळा